महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
डॅा ॲनी बेंझट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१
दूरध्वनी क्रमांक ०२० २६१२५६९२ ई-मेल- depmah२@gmail.com

---

जा.क्र.प्राशिसं /टे-३०१/२०२६ दिनांक- ५ /८/२०२६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सर्व

विषय- मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र ५९४३/२०२६ च्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत

संदर्भः-१.शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४४/टीएनटी- १/दि.२९/७/२०२६
२.शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र क्र प्राशिसं/ड-३०१/शिक्षक संवर्ग पदोन्नती/२०२६/दि.१४/५/२०२६
३. रिट याचिका क्र.४५७४/२०२६ या प्रकरणी मा. उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर यांनी पारित केलेला दि.१०/७/२०२६ रोजीचा न्यायनिर्णय
४.संचालनालयाचे पत्र क्र.१/२०१४५७१/२०२६/दि.१०/७/२०२६
५.संचालनालयाचे पत्र क्र. १/२०५२७३५/ दि.३०/७/२०२६

विषयांकित प्रकरणी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय दि.२९/७/२०२६ मध्ये जिल्हा परिषद आस्थापनेवरील शिक्षक संवर्गातून विविध पदांवर पदोन्नतीसाठीची कालबध्द कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार संचालनालयाचे संदर्भ क्र.५/१/२०५२७३५/ दि.३०/७/२०२६ रोजीच्या पत्रान्वये आपणांस कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

परंतु शालेय शिक्षण विभागाच्या दि.२९/७/२०२६ रोजीच्या शासन निर्णयाला मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र. ५९४३/२०२६ अन्वये आव्हान देण्यात आले असून मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शालेय शिक्षण विभागाने २९-७-२०२६

रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातील खंड ४(अ) च्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात आलेली आहे.

त्यामुळे सन २०२६ च्या माहे ऑगस्ट मधील (शासन निर्णयातील ४ अ नुसार) चालू वर्षी करावयाच्या पदोन्न्तीबाबतची कार्यवाही शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात येत आहेत.

Digitally signed by
Sharad Shankargiri Gosavi
Date: 05-08-2026
18:49:44

(शरद गोसावी)
शिक्षण संचालक(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव
१. विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,सर्व

प्रत माहितीस्तव सविनय सादर-
१. मा. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२.मा.आयुक्त (शिक्षण),आयुक्त शिक्षण कार्यालय, महाराष्ट्र राज्य,पुणे